**MHBU100028222025** सक्सेशन केस क्र.२९/२०२५

विजयकुमार - वि - कोणी नाही.

निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तराधिकारपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सर्व बाबींचे अवलोकन करता निम्नलिखित मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले असून त्यावर माझे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मयत कमल हरी पाटील यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हे वारसदार असल्याने व ते उत्तराधिकारपत्र मिळण्यास हक्कदार असल्याचे अर्जदारांनी शाबीत केले आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

कारणमिमांसा

३. अर्जदार क्र.१ ते ४ यांनी आपल्या अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ अनुक्रमे निशाणी क्र.११ व १७ कडे मयत कमल हरी पाटील यांची जळगाव शहर महानगरपालिका जन्म – मृत्यु विभाग व डॉ. हरीभाऊ नारायण पाटील यांचे ग्राम पंचायत कार्यालय दाताळा येथील मृत्यु प्रमाणपत्राच्या सत्यप्रती दाखल केल्या आहेत. तसेच त्यांनी कमल हरी पाटील यांच्या सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया येथील पासबुकाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. अर्जदारांनी सामना वृत्तपत्रातील दि.०७.०१.२०२६ रोजीचे आवृत्तीमधील जाहीर प्रकटन निशाणी क्र.१३ हा कागदोपत्री पुरावा अर्जदारांनी सादर केला आहे. तसेच त्यांनी पुरावा संपल्याबाबत पुरसीस निशाणी क्र.१४ वर दाखल केली आहे. अर्जदारांनी सरतपासणी प्रतिज्ञालेख निशाणी क्र. १० वर सादर केला आहे. याशिवाय, त्यांनी निशाणी क्र.४ कडील दस्तऐवज यादी खाली अर्जदार क्र.१ ते ४ च्या आधार कार्डच्या प्रमाणीत प्रती दाखल

केल्या आहेत.

<u>मुद्दा क्र. १ करिताः-</u>

४. अर्जदारांनी त्यांच्या प्रतिज्ञालेखामध्ये अर्जातील सर्व मजकूर शपथेवर सांगितलेला आहे. त्याने सांगितले आहे की, त्यांची आई नामे कमल हरी पाटील ही दि.१८.०६.२०२४ रोजी मौजे जळगांव ता.जि. जळगांव येथे मयत झालेली असुन, त्यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. मयत कमल हरी पाटील यांच्या नावे अर्जातील नमुद सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दाताळा येथे खाते असून येथील खाते क्र.३९२४००२८५९ मध्ये रुपये ४,६८,३८६.५०/- सदर रक्कम वारस नात्याने मिळणेकरीता त्यांना उत्तराधिकारपत्राची आवश्यकता आहे. अर्जदारांतर्फे दाखल केलेल्या निशाणी क्र.११ वरील मृत्यु प्रमाणपत्रावरुन असे दिसुन येते की, कमल हरी पाटील या दि. १८.०६.२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्याचप्रमाणे अभिलेखावरून असे दिसून येते की, मयताचे पती हरीभाऊ हे देखील दि.२३.०४.२०१६ मयत झाले आहेत.

५. दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सामना वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रकटन करुन कोणीही सदर प्रकरणात विरोध व हरकत घेण्याकरीता न्यायालयात हजर झालेले नाही. त्यामुळे अर्जदारांतर्फे सादर केलेला पुरावा हा अबाधित व अखंड राहीलेला आहे. सदर पुराव्यावरून असे दिसून येते की, मयत कमल हरी पाटील यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार आहेत व त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत कमल हरी पाटील यांचे नावे असलेल्या अर्जातील नमुद सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दाताळा येथील खाते क्र.३९२४००२८५९ मधील रक्कम रुपये ४,६८,३८६.५०/- सदर रक्कमेबाबत उत्तराधिकारपत्र मिळणेस हक्कदार आहेत. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे. सदर रक्कम अर्जदारांनी मिळण्याची विनंती केली आहे. परिणामतः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदारांना मयत कमल हरी पाटील यांचे नावे असलेली अर्जात नमुद सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दाताळा येथील खाते क्र.३९२४००२८५९ मधील रक्कम मिळणे करीता वारस असलेबाबत उत्तराधिकारपत्र देण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ३. | सदरील उत्तराधिकारपत्राचा अर्जातील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर कारणांकरीता वापर करणार नाही व सदर प्रमाणपत्रानुसार त्यांना मिळालेल्या रक्कमेचा संपुर्ण तपशील या न्यायालयासमोर दाखल करतील असे लेखी अभिवचन अर्जदारांनी सादर करावे. |
| ४. | तसेच सदर रक्कमेबाबत कोणाकडूनही तक्रार आल्यास अथवा न्यायालयाने आदेशित केल्यास सदर उत्तराधिकारपत्रानुसार मिळालेली सर्व रक्कम विनातक्रार न्यायालयात भरतील असेही लेखी अभिवचन अर्जदारांनी दाखल करावे. |
| ५. | या संदर्भी अर्जदारांनी नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क जमा करावे. |

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.04.02 17:55:53 +0530

**(पी.एस.ठाकरे )**
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, मलकापूर

दि. ०२/०४/२०२६

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Court | J.M.F.C. Court No.1, Malkapur |
| Date | 02/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | 02/04/2026 |
| Order uploaded on | 02/04/2026 |